| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २८/११/२०२३ |
| नोंदणी तारीख | : | २८/११/२०२३ |
| निकाल तारीख | : | ०१/०४/२०२६ |
| कालावधी | | २ वर्षे, ४ महिने, ४ दिवस |

MHSO110046492023

**<u>३रे सह दिवाणी न्यायालय क. स्तर, माळशिरस यांचे न्यायालयात,</u>**
**<u>ता. माळशिरस, जि. सोलापूर</u>**
**(पिठासीन अधिकारी – जी. एम. बिरादार)**

**नियमित दिवाणी दावा क्रं. १४०७/२०२३** **निशाणी क्र. ३९**

**महाराष्ट्र ग्रामीण बँक तर्फे** }
**वरिष्ठ व्यवस्थापक अविनाश प्रभाकर आचार्य,** }
वय – ५८ वर्षे, धंदा – नोकरी, }
रा. निमगांव, ता. माळशिरस, सोलापुर. } **...वादी**

**विरूध्द**

**१. सिमा ज्ञानेश्वर तिकुटे, वय – २८ वर्षे,** }
**२. हिराबाई विष्णु पालवे, वय – ४७ वर्षे,** }
**३. वंदना तानाजी वाघमोडे, वय –३० वर्षे,** }
**४. शिलाबाई अशोक धाईंजे, वय –५३ वर्षे,** }
**५. कलावती अर्जुन वाघमोडे, वय –४६ वर्षे,** }
सर्वांचा धंदा – शेती/दुग्ध व्यवसाय, सर्व रा. भांबुर्डी, }
ता. माळशिरस, जि. सोलापूर **...प्रतिवादी**

**......दावा रक्कम रुपये २,४२,५१८/– वसुल होणेबाबत..**

....................................................................................................................

वादी तर्फे विधिज्ञ श्री. एस. एल. भोसले
प्रतिवादी तर्फे विधिज्ञ – एकतर्फा प्रकरण चालविणेचे आदेश

....................................................................................................................

**न्यायनिर्णय**
(दिनांक १ एप्रिल, २०२६ रोजी घोषित)

वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीकडुन रक्कम रुपये २,४२,५१८/– व्याजासह वसुल होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२) **प्रतिवादीकडुन येणे रकमेचा तपशील खालीलप्रमाणे :**

| रक्कम रुपये | तपशील |
|---|---|
| १,५०,३११/– | दिनांक ३१/०३/२०२१ पर्यंतच्या गाई खरेदी कर्ज व्याजा सहीत येणे बाकी |
| ८७,८०७/– | दिनांक ३१/०३/२०२१ पासून दि. २८/११/२०२३ पर्यंतचे १५.५% प्रमाणेचे म्हैशी खरेदी कर्ज अनचार्जज्ड व्याज |
| ४,४००/– | नोटीस फी |
| **२,४२,५१८/–** | **एकुण येणे रक्कम** |

**वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** :–

३) वादी रिजनल रुरल बँक कायदयाप्रमाणे स्थापित झालेली बँक असून वादीचा बँकीगचा व्यवसाय आहे. वादी बँकेच्या अनेक शाखा असून त्यापैकी एक शाखा

मौजे माळशिरस, ता. माळशिरस येथे आहे. वादी बँकेचे नाव भारत सरकारचे दिनांक ०७/०४/२०२५ रोजीचे राजपत्र CG-DL-E-07042025-262329 ‘महाराष्ट्र ग्रामीण बँक’ असे आहे. प्रतिवादी नं. १ ते ५ हे मौजे भांबुर्डी, माळशिरस येथील कायमचे रहिवासी असुन त्याचा प्रतिवादी यांनी निसर्ग Joint Liability Group माळशिरस या नावाने गट स्थापन करुन वादी बॅकेकडे सदर ग्रुपने म्हैशी खरेदीसाठी कर्जाची मागणी वादी बँकेकडे केली होती. दिनांक २१/०९/२०१८ रोजी वादी बँकेने प्रतिवादी यांना रक्कम रुपये १,५०,३११/– कर्ज दिले. तसेच कर्जास द.सा.द. शे. १५.५% अधिक शर्ती व अटीनुसार बदलते व्याज दर देणेचे ठरले आहे. तसेच व्याजाची आकारणी वेळोवेळी आर.बी.आय.चे व वादी बँकेच्या धोरणात बदल झाल्यास त्यानुसार केली आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी यांनी वादी बँकेस सदर कर्ज प्रकरणासाठी सर्व कागदपत्रे लिहुन दिली आहेत.

४) प्रतिवादी यांनी ठरल्याप्रमाणे वादी बँकेचे संपूर्ण कर्ज रक्कम परतफेड केली नाही. वादी बँकेने प्रतिवादी यांना दिनांक २८/०१/२०२०, ०८/०४/२०२१, २५/१०/२०२३ रोजी त्यांचे म्हैशी खरेदीसाठी घेतलेल्या कर्जाच्या रक्कमेची मागणी वकीलांमार्फत नोटीस देवून केली. तरीही प्रतिवादी यांनी वादी बँकेची संपुर्ण रक्कम परतफेड केली नाही. त्यामुळे वादीस प्रतिवादी यांचेविरुध्द सदरचा दावा मुद्दल व व्याज अधिक अनचार्जड व्याज वसुल होवुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादी यांचेकडुन येणेबाकी रक्कम रुपये २,५०,०००/– व त्यावर दिनांक

२१/०९/२०१८ पासुन द.सा.द.शे. १५.५% प्रमाणे संपुर्ण रक्कम वसूल होईपर्यत व्याजासह रक्कम व इतर खर्च वसुल होवुन मिळावे अशी विनंती केलेली आहे.

५) प्रस्तुत दाव्याचे समन्स बजावणी झालेनंतर प्रतिवादी प्रकरणात हजर झाले नाहीत. त्यामुळे त्यांचेविरुध्द दिनांक २३/१०/२०२४ रोजी प्रकरण एकतर्फा आदेश पारीत करणेत आले.

६) वादीचे कथनांच्या आधारे खालील मुद्दे उपस्थित होतात, त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १) | प्रतिवादी यांनी एकुण रक्कम रुपये २,४२,५१८/- वादीला देणे लागतो, असे वादी शाबीत करतो का? | : | **अंशतः होय.** |
| २) | प्रतिवादींनी १५.५% व्याजासह रक्कम वादीला देणे लागतो, असे वादी शाबीत करतो का? | : | **अंशतः होय.** |
| ३) | काय आदेश व हुकुमनामा? | : | **दावा अंशतः मंजूर केला आहे.** |

## कारणमिमांसा

७) **वादीचा पुरावाः-**

वादीने त्याच्या कथनाच्या पृष्टयर्थ खालील नमुद साक्षीदार तपासले

आहेत.

| अ.क्रं. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | महादेव कृष्णात हेबळे | वादी तर्फे साक्षीदार | **१५** |

वादीने तोंडी पुरावा संपल्याची पुरसीस निशाणी क्रं. **३८** प्रमाणे दाखल केली आहे.

८) वादीने त्याचे तोंडी पुराव्याचे पृष्टयर्थ खालील कागदपत्रांचा आधार घेतला आहे.

| अ.क्रं | कागदपत्राचे वर्णन.. | नि. क्रं. |
|---|---|---|
| १. | प्रतिवादीचा कर्ज मागणी अर्ज | १७ |
| २. | प्रतिवादी कर्ज मंजूरी पत्र | १८ |
| ३. | डी.पी.नोट | १९ |
| ४. | प्रतिवादीने वादी बॅकेस लिहून दिलेले अधिकारपत्र (AG-15) | २० |
| ५. | प्रतिवादीने वादी बॅकेस लिहून दिलेले पत्र (VKGB-1) | २१ |
| ६. | प्रतिवादी नं. १ ते ५ यांनी वादी बॅकेस लिहून दिलेला करारनामा (Joint Liability Agreement) | २२ |
| ७. | प्रतिवादीने वादी बॅकेस दिलेले लिहुन दिलेला करारनामा (CHA-1) Hypothecation cum loan Agreement. | २३ |

| | | |
|---|---|---|
| ८. | प्रतिवादीयांना रजिस्टर पोष्टाने नोटीस पाठविलेली पोष्टाची पोहोच पावती (५ स्थळ प्रत ) | २५ ते २९ |
| ९. | प्रतिवादी यांनी वादी बॅकेकडुन घेतलेल्या कर्जाबाबत लिहून दिलेले Acknowledgement of Debt/Securities. | ३२ |
| १०. | प्रतिवादी यांनी वादी बॅकेकडून घेतलेल्या कर्जाबाबात लिहून दिलेले Acknowledgement of Debt/Securities. | ३३ |
| ११. | प्रतिवादीच्या कर्जाच्या खात्याचा खातेउतारा | ३४ |
| १२. | प्रतिवादीस पाठविलेल्या नोटीसीची प्रत | २४ व ३० |
| १३. | प्रतिवादीस पाठविलेल्या नोटीसीकरीता दिलेली रिसीट | ३१ |
| १४. | बॅकेने श्री. महादेव हेबळे यांना दिलेले अधिकारपत्र | ३७ |
| १५. | भारत सरकारचे राजपत्राची प्रत | ३५ |
| १६. | शाखाधिकारी यांना दिलेले अधिकारपत्राची प्रत | ३६ |

**मुद्दा क्रं. १ ते ३ करिता :–**

**९)** मुद्दा क्रं. १ ते ३ एकमेंकासोबत सलग्न असल्याने व त्याबाबतचा पुरावा सुद्धा एकत्र आला असल्याने त्यांना चर्चेकरीता एकत्रीत घेण्यात आले आहे.

**१०)** न्यायाचे हे प्रस्थापित तत्व आहे की, जो व्यक्ती एखादी बाब कथन करतो ती बाब सिध्द करण्याची जबाबदारी ही त्या व्यक्तीवर असते.

**११)** वादीने केलेल्या कथनांच्या सिध्दीकरीता वादी तर्फे साक्षीदार महादेव कृष्णात हेबळे यांचे निशाणी क्रं.१५ कडे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामध्ये दाव्यातील कथनांप्रमाणेच साक्ष दिली आहे. वादीने प्रतिवादी यांना म्हैशी खरेदीसाठी दिनांक २१/०९/२०१८ रोजी रक्कम रुपये १,५०,३११/– कर्ज दिले होते. त्यानंतर प्रतिवादी यांनी ठरल्याप्रमाणे वादी बँकेचे संपूर्ण कर्ज रक्कम परतफेड केली नाही. त्यामुळे वादी बॅकेने दिनांक २८/०१/२०२०, ०८/०४/२०२१ रोजी त्यांचे घेतलेल्या कर्जाच्या रक्कमेची वकीलांमार्फत नोटीस देवून मागणी केली. तरीही प्रतिवादींनी रक्कमेची परतफेड केली नाही. त्यामुळे दिनांक २१/०९/२०१८ पर्यत प्रतिवादींकडुन रक्कम रुपये २,५०,०००/– कर्ज येणेबाकी आहे.

**१२)** वादीने तोंडी कथनांव्यतिरिक्त अभिलेखावर निशाणी क्रं. १७ ते ३६ वर वादी बॅकेस प्रतिवादींनी करुन दिलेली कागदपत्रे दाखल केलेले आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी यांना त्यांच्या मागणीप्रमाणे कर्ज रक्कम रुपये १,५०,३११/– दिलेले आहे. तसेच निशाणी क्रं. ३४ वर दाखल केलेल्या खातेउता–याचे अवलोकन केले असता प्रतिवादींकडुन रक्कम रुपये १,५०,३१०/– येणे बाकी असल्याचे दिसुन येते. तसेच सदर रक्कमेची मागणी वादीने प्रतिवादीस नोटीस पाठवुन केल्याबाबत कथन केले आहे. सदर कथनाच्या अनुषंगाने वादीने निशाणी क्रं.२५ वर नोटीसची प्रत व त्याची रिसीट निशाणी क्रं. २६ वर दाखल केलेली आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वादीने रक्कमेची मागणी प्रतिवादींस केलेली

असताना देखील रक्कम व्याजासह परत दिलेली नाही असे दिसुन येते. सदर कथनांबाबत प्रतिवादीने पुरेशी संधी देवुन देखील उलटतपास घेतलेला नाही अथवा पुरावा खोडुन काढलेला नाही. त्यामुळे प्रतिवादींकडुन रक्कम रुपये १,५०,४६०/- रुपये येणे बाकी असल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध होते.

**१३)** वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन प्रतिवादीने वादीकडुन रक्कम घेतल्याचे दिसुन येते. वादीने प्रतिवादी विरुध्द रक्कम रुपये २,४२,५१८/- वर १२.५% प्रमाणे द.सा.द.शे. प्रमाणे दिनांक २८/११/२०२३ पर्यतचे कर्ज अनचार्जड् व्याजासह देणेबाबत विनंती केलेली आहे. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिले असता, प्रतिवादींनी वादी बॅकेकडुन कर्ज रक्कम रुपये १,५०,४६०/- व्याजदर वार्षीक १२.५% प्रमाणे स्वीकारलेले आहेत. सदर कागदपत्रांवर त्यांच्या सहया आहेत. तसेच सदर रक्कम त्यांच्या कर्ज खात्यामध्ये वर्ग केलेली आहे. प्रतिवादी यांनी कर्जाची परतफेड वेळेत केलेली नाही. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे अथवा पुरावा सादर केलेले नाही. कर्ज रक्कमेबाबत तसेच व्याजदराबाबत कोणताही प्रश्न उपस्थित केलेला नाही. तरी वादीच्या मागणीनुसार देय रक्कमेवर प्रतिवादीकडुन १२.५% प्रमाणे द.सा.द.शे व्याज वसुल करणे न्यायोचित होईल. सबब, मुद्दा क्रं. १ व २ चे उत्तर होकारार्थी देवुन मुद्दा क्रं. ३ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचा दावा खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना आदेशीत करण्यात येते की, वादीस रक्कम रुपये १,५०,४६०/– आजपासुन तीन महिन्यात परत करावे.

३. दावा दाखल तारखेपासुन रक्कम रुपये १,५०,४६०/– या रक्कमेवर दावा दाखल झाल्याच्या तारखेपासुन ६% प्रति वर्ष प्रमाणे व्याज प्रतिवादीकडुन दाव्याची रक्कम पुर्ण वसुल होईपर्यत वादीला दयावी.

४. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात टंकलिखीत व उद्घोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by GULFARAZ MAQSOOD BIRADAR
Date: 2026.04.02 17:24:53 +0530

स्थळ : माळशिरस **(जी. एम. बिरादार)**

दिनांक : ०१/०४/२०२६ ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, माळशिरस.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word as per the original Judgment

(a) Name of the Stenographer : P. S. Kore

(b) Name of the Court : 3rd Jt. C.J.J.D., Malshiras, Dist. Solapur.

(c) Judgment signed by P.O. on : 02/04/2026

(d) Judgment uploaded on : 02/04/2026